# महाराष्ट्र शासन

## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन,

**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१,दुरध्वनी क्र. :-** (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३

**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल :-** director. dol@ maharashtra.gov.in

## निवेदन

**शासकीय ग्रंथालयांसाठी सन २०२६-२८ करिता ई-बुक्स खरेदीचे सूटदर (e-books purchase Discount Rate निश्चिती करणेबाबत.**

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील **ई-बुक्स** (e-books) खरेदी निधीच्या उपलब्धतेनुसार करावयाची आहे. त्यासाठी ई-बुक्स सूटदर खालील नमुन्यात सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | विषय (सूटदर %) सर्व करासह G.S.T. | भाषा | | | शेरा/ तपशील |
|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी | ई-बुक्स चे सूटदर ग्रंथ नामे ०-१०० , १००-५००,५०० पेक्षा जास्त/प्रती सदर ई-बुक्स (e-books) सूटदर हे ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील ४४ शासकीय ग्रंथालयांसाठी लागू राहतील. |
| १. | ललित | | | | |
| २. | सर्वसामाजिक शास्त्रे | | | | |
| ३. | बालवाङ:मय | | | | |
| ४. | स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ | | | | |
| ५. | सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ | | | | |
| ६. | शासकीय प्रकाशने | | | | |
| ७. | नवसाक्षरांसाठीचे साहित्य/ वाङ्मयेत्तर | | | | |

सदर संबंधित ई-बुक्स विक्रेत्यांकडून, वितरकांकडून, प्रकाशन संस्थाकडून ग्रंथांच्या मूळ किंमतीवर ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांकरिता ई-बुक्स ॲक्सेस/पुरवठासाठी किती सूट देऊ शकतील याबाबतचे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**ई-बुक्स सूटदरकरीता दरपत्रक सोबत खालील पुरावे साक्षांकित छायाप्रतीसह जोडण्यात यावेत.**

१. पुरवठा करण्यात येणारे ई-बुक्सची विषयनिहाय यादी प्रकाशन वर्ष व किंमतीसह जोडणे आवश्यक राहील.
२. ई-बुक्सची गोपनीयता (secrecy) ठेवणे बंधनकारक राहील.
३. ई-बुक्सचा Access Remote, Laptop, Desktops and Mobile ला किमान ५ वर्षासाठी असणे आवश्यक आहे.
४. राष्ट्रीय / राज्यस्तरीय ई-बुक्स विक्रेत्या संघटनेशी सभासद नोंदणी आवश्यक आहे.
५. PAN/TAN Card प्रत जोडणे आवश्यक आहे.
६. मागील ३ वर्षाचे आयकर भरलेले प्रमाणपत्र प्रमाणित केलेले जोडणे आवश्यक राहील.
७. शॉप ॲक्ट लायसन्स किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी.
८. शासकीय/निमशासकीय व स्वयंसेवी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथलयास ग्रंथपुरवठा केल्याचा पुरावा जोडण्यात यावा.

सदर ई-बुक्स सूटदर खरेदीचे दरपत्रक **दि. २२ मे, २०२६** पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१** यांचेकडे समक्ष वा पोस्टाने पाकीटावर **"ई-बुक्स खरेदीवरील सुटदर सन २०२६-२८ (दोन वर्षांकरिता) दरपत्रक"** अशी नोंद करुन पाठवावी. या नमूद तारखेनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रक **दि.२६ मे, २०२६** रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी इच्छुकांनी स्वखर्चाने ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई-०१ येथे उपस्थित रहावे. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी वरील विषयांकित ई-बुक्सच्या किंमतीवर तुलनात्मक दृष्टया विषयनिहाय जो जास्तीत जास्त सूटदर असेल तो विचारपूर्वक चर्चेतून, वस्तूनिष्ठ निश्चित केला जाईल. निश्चित करण्यात आलेले सूटदर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांना कळविण्यात येतील. तसेच संचालनालयाच्या **www.dol.maharashtra.gov.in,** या संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) करण्यात येतील.

संचालनालयास प्राप्त झालेल्या दरपत्रकच्या आधारे ई-बुक्सखरेदीसाठी ई-बुक्स विक्रेत्यांची किंवा ई-बुक्स वितरकांची किंवा प्रकाशन संस्थांची निवड करण्यात येणार नसून विषय निहाय ई-बुक्सखरेदी सूटदर निश्चित करण्यात येणार आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच दरपत्रक स्विकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे हे सर्व अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी राखून ठेवले आहेत.

सन २०२६-२८ या वर्षाकरिता मान्य /निश्चित झालेल्या सूटदरानुसार कोणीही पुरवठादार शासकीय ग्रंथालयांना **ई-बुक्स** (e-books) पुरवठा करु शकतील.

मुंबई
दि.०८/०५/२०२६

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र.ग्रंथालय संचालक**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१,दुरध्वनी क्र. :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३**
**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल :-** director. dol@ maharashtra.gov.in

## निवेदन

**शासकीय ग्रंथालयांसाठी सन २०२६-२८ ग्रंथखरेदीचे सूटदर (Book purchase Discount Rate) निश्चिती करणेबाबत.**

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील पुढीलप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार खरेदी करावयाचे आहेत.

| अ.क्र. | विषय | भाषा | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १. | ललित | | | |
| २. | सर्वसामाजिक शास्त्रे | | | |
| ३. | बालवाङ:मय | | | |
| ४. | स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ | | | |
| ५. | सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ | | | |
| ६. | शासकीय प्रकाशने | | | |
| ७. | नवसाक्षरांसाठीचे साहित्य/ वाङ्मयेत्तर | | | |

सदर संबंधित ग्रंथ विक्रेत्यांकडून,वितरकांकडून,प्रकाशनसंस्थेकडून ग्रंथांच्या मूळ किंमतीवर ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांकरिता ग्रंथपुरवठा करण्यासाठी किती जास्तीत जास्त सूट देऊ शकतील याबाबतचे सूट दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सूट दरपत्रकासोबत पॅनकार्ड, मागील तीन वर्षाचे आयकर भरलेले विवरणपत्र, शॉप ॲक्ट लायसन्स किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय किंवा निमशासकीय व स्वयंसेवी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांस ग्रंथपूरवठा केला असल्यास त्याचा पुरावा इत्यादींच्या साक्षांकित छायाप्रती सीलबंद पाकिटातून **दि. २२ मे २०२६** पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१** यांचेकडे समक्ष वा पोस्टाने पाकीटावर "**ग्रंथ खरेदीवरील सुटदर २०२६-२८ (दोन वर्षाकरिता) दरपत्रक**" असे नमूद करुन पाठवावे. या तारखेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रक/ निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रक/निविदा **दि. २६ मे २०२६** रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.त्यावेळी इच्छुकांनी स्वखर्चाने ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई येथे उपस्थित राहता येईल. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी वरील विषयांकित ग्रंथांच्या छापील किंमतीवर तुलनात्मक दृष्टया ग्रंथ प्रकार निहाय जो जास्तीत जास्त सूटदर असेल तो चर्चेतून सर्वानुमते निश्चित केला जाईल. निश्चित करण्यात आलेले सूटदर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांना कळविण्यात येतील. तसेच संचालनालयाच्या **www.dol.maharashtra.gov.in,** या संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) करण्यात येतील.

संचालनालयास प्राप्त झालेल्या सूटदरपत्रकाच्या आधारे ग्रंथखरेदीसाठी ग्रंथ विक्रेत्यांची किंवा ग्रंथ वितरकांची किंवा प्रकाशन संस्थांची निवड करण्यात येणार नसून विषय निहाय ग्रंथखरेदी सूटदर निश्चित करण्यात येणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच सूट दरपत्रक स्विकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे हे सर्व अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी राखून ठेवले आहेत.

सन २०२६-२८ या वर्षाकरिता मान्य /निश्चित झालेले सूटदरानुसार कोणीही पुरवठादार शासकीय ग्रंथालयांना ग्रंथ पुरवठा करु शकतील.

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र.ग्रंथालय संचालक**

**मुंबई.**
**दि:-** ०८/०५/२०२६